स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

रासेयो/२०२५–२६/१६४ दि. २३/०७/२०२६

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**फक्त पुणे शहर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : 'नशामुक्त युवा' अभियान या एकदिवशीय उपक्रमामध्ये सहभागी होणेबाबत...**

महोदय/महोदया,

आजचा युवा वर्ग हा केवळ उद्याचा नागरिक नसून आजच्या समाजपरिवर्तनाचा सक्रिय घटक आहे. युवकांची ऊर्जा, सर्जनशीलता, सामाजिक जाणीव आणि कृतीक्षमतेच्या योग्य दिशेने उपयोग झाला तर देशासमोरील अनेक आव्हांनावर प्रभावी उपाय निर्माण होऊ शकतात. या भावनेतून मा. आयुक्त, पुणे शहर पोलीस, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि युवान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहरातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांकरिता 'नशामुक्त युवा' अभियान उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर उपक्रमामध्ये पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने पुणे शहरातील महाविद्यालये, शैक्षणिक संस्था आणि युवकांपर्यंत विविध जनजागृती उपक्रम, संवाद सत्रे आणि सामाजिक अभियानांच्या माध्यमातून पोहोचण्याचा मानस आहे. सदर उपक्रमांतर्गत पुणे शहरातील विद्यार्थी स्वयंसेवकांकरिता स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृह, इरावती कर्वे संकुल या ठिकाणी, दि. २८ जुलै, २०२६ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पुणे पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार (भापोसे), श्रीमती ज्योतिप्रिया सिंग (भापोसे), श्रीमती तेजस्विनी सातपुते (भापोसे), प्रा.डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, प्रा.डॉ. पराग काळकर, प्र–कुलगुरू इत्यादी मान्यवर उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करणार आहेत.

अमली पदार्थ विरोधी सेल प्रत्येक महाविद्यालयामध्ये स्थापन करण्याचे उद्दीष्ट आहे. तरी सदर उपक्रमाकरिता केंद्रशासनाच्या निर्देशानुसार **पुणे शहरातील ५ स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांना अनिवार्यपणे दिनांक २८ जुलै, २०२६ रोजी, दुपारी २.०० वाजता, स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृह, इरावती कर्वे संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ** याठिकाणी उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.

सदर उपक्रमामध्ये उपस्थित राहण्याकरिता **https://forms.gle/z6iBgi6UU4UoARRE6** या गुगल लिंकद्वारे अनिवार्यपणे नावनोंदणी करणे आवश्यक आहे. सदर उपक्रमाकरिताचा प्रवास खर्च महाविद्यालयाच्या रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

Bhame.

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**

***नावनोंदणी दुपारी २ ते २.३०***
***उपक्रम सत्र दुपारी ३.०० वाजता***
***अल्पोपाहार सायं. ५.३० वाजता***